चंद्रपूर जिल्हयातील चिचपल्ली बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राकरीता निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. वनबां-२०१७/प्र.क्र.२१३/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २६ सप्टेंबर, २०१७

वाचा :- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जून, २०१७
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.वनबां-२०१७/प्र.क्र.७३/फ-९, दिनांक ०३ मार्च,२०१७
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.वनबां-२०१७/प्र.क्र.७२/फ-९, दिनांक ०८ मार्च,२०१७
४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.वनबां-२०१७/प्र.क्र.७०/फ-९, दिनांक १६ मार्च,२०१७
५) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.वनबां-२०१७/प्र.क्र.२१३/फ-९, दिनांक ०२ जून,२०१७
६) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.वनबां-२०१६/प्र.क्र.५५/फ-९, दिनांक ०५ जून,२०१७
७) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्र. कक्ष १/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.१४/(१७-१८)/१०९७/२०१७-१८, दिनांक ०६.०९.२०१७ रोजीचे पत्र.

प्रस्तावना :-

राज्य योजने अंतर्गत सन २०१७-१८ करिता राज्य योजनेअंतर्गत चिचपल्ली (ता.जि.चंद्रपूर) येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे (४४१५ ०१९२) या योजनेकरीता रू. २०५०.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पीत आहे.

त्यानुषंगाने, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक ७ अन्वये प्रस्ताव सादर केला व निधी वितरीत करण्याची विनंती केली. त्यास अनुसरून, चंद्रपूर जिल्हयातील चिचपल्ली येथील बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राकरीता ५०-इतर खर्च रू.३२३.७६ लक्ष, ५२-यंत्रसामुग्री रू. ३०.९१ लक्ष व ५३- मोठी बांधकामे रु.१४६५.६४ लक्ष असे एकूण रू. १८२०.३१ लक्ष इतका निधी वितरीत करण्याबाबत विनंती केली आहे. तथापि, संदर्भ क्र.१ अन्वये वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये सन २०१७-१८ वर्षाकरीता भांडवली खर्च योजनाअंतर्गत अर्थसंकल्पीत निधीच्या ८०% मर्यादेत निधी वितरणास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने (४४१५ ०१९२) या योजनेकरीता रु.२०५०.०० लक्ष मंजूर नियतव्यय असल्यामुळे त्याच्या ८०% म्हणजे रु.१६४०.०० इतकी रक्कम येते. यापूर्वी या रक्कमेतून रु.२६७.९० इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे उर्वरित रक्कम रु.१३७२.१० लक्ष इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णयः-</u>

वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये सन २०१७-१८ वर्षाकरीता भांडवली खर्च योजनाअंतर्गत अर्थसंकल्पीत निधीच्या ८०% मर्यादेत निधी वितरणास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने, प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन, चंद्रपूर जिल्हयातील चिचपल्ली येथील बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राकरीता शिर्षनिहाय ५०- इतर खर्च रु.३०३.७६ लक्ष, ५२-यंत्रसामुग्री रु.१०.९१ व ५३- मोठी बांधकामे रु.१०५७.४३ (बांबू संशोधन केंद्र व प्रशिक्षण केंद्रामध्ये शैक्षणिक इमारतीचे पूर्वेकडील भागाच्या बांधकाम रु.३५०.०० लक्ष, पश्चिमेकडील भागाच्या बांधकामास रु.३५०.०० लक्ष व दक्षिणेकडील भागाच्या बांधकामासाठी रु.३५७.४३ लक्ष) असा एकूण रू.१३७२.१० लक्ष इतका निधी ४४१५ ०१९२ यालेखाशीर्षा अंतर्गत विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.

१. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे. वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गतच्या तरतूदीचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
२. प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी विहीत पध्दतीचे पालन करावे व आवश्यकतेनुसार आहरण करावे. सदरहू निधी वितरीत करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या कामांना सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी असल्याची व त्याच बरोबर सध्या वाटप करण्यात येणाऱ्या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर योजनेकरीता मागील वर्षी वितरीत केलेल्या निधीच्या विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र शासनास सादर केले जाईल, याची दक्षता घ्यावी.
३. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.
४. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी- २०११/प्र.क्र. १७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-१०, प्रधान शिर्ष ४४१५, कृषी विषयक संशोधन व शिक्षण यावरील भांडवली खर्च, ०६ वनीकरण, पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना, राज्य योजना अंतर्गत योजना, (००४) संशोधन (००) (०२) बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली (४४१५ ०१९२) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करिता उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२६१७२६४९३९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशा नुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2017.09.26 17:15:14 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर.
६. संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली, चंद्रपूर
७. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
८. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-३), मंत्रालय, मुंबई-३२.
९. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
१०.नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
११.फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२.कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती).